**ठळक बातम्या**

- चालू आर्थिक वर्षात जीडीपी ६ पूर्णांक ४ दशांश टक्के राहण्याचा सांख्यिकी मंत्रालयाचा अंदाज

- एचएमपीव्ही संसर्गाबाबत घाबरू नये; मात्र खबरदारी घेण्याचं राज्य शासनाचं आवाहन

- दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी ५ फेब्रुवारी रोजी मतदान,  ८ फेब्रुवारीला मतमोजणी

**आणि**

- नेपाळ-तिबेट सीमा भागात झालेल्या भूकंपात ९५ जणांचा मृत्यू, १३० जण जखमी

**<><><><><>**

भारताचा २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठीचा जीडीपी अर्थात, स्थूल राष्ट्रीय उत्पादन वाढीचा दर ६ पूर्णांक ४ दशांश टक्के असेल, असा प्राथमिक अंदाज सांख्यिकी आणि कार्यक्रम अंमलबजावणी मंत्रालयानं व्यक्त केला आहे. या मंत्रालयाच्या राष्ट्रीय सांख्यिकी कार्यालयानं आज याबाबतची आकडेवारी प्रसिद्ध केली. त्यानुसार एकूण स्थूल राष्ट्रीय उत्पादनात ९ पूर्णांक ७ दशांश टक्के वाढ दिसून आली आहे. तर प्रत्यक्ष स्थूल मूल्यवर्धित वाढ ६ पूर्णांक ४ दशांश टक्के दिसून आली आहे.

कृषी आणि संबंधित क्षेत्रांमधली ही वाढ ३ पूर्णांक ८ दशांश टक्के झाली आहे. बांधकाम क्षेत्र तसंच वित्तीय, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवा क्षेत्रातही चांगली वाढ अपेक्षित आहे. बांधकाम क्षेत्रात ही वाढ ८ पूर्णांक ६ दशांश टक्के, तर

वित्तीय, स्थावर मालमत्ता आणि व्यावसायिक सेवा क्षेत्रांसाठी ही वाढ ७ पूर्णांक ३ दशांश टक्के असेल, असा अंदाज यात व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

डिजिटल वैयक्तिक डेटा सुरक्षा नियम २०२५ च्या मसुद्यामुळे भारताची नागरिक केंद्री सुशासनाप्रती वचनबद्धता अधोरेखित होते, असं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी लिहिलेल्या लेखाच्या संदर्भात ते बोलत होते. या नियमावलीमुळे केवळ वैयक्तिक डेटाचेच संरक्षण नव्हे तर प्रगती आणि सर्वसमावेशकतेलाही प्रोत्साहन मिळेल, असं त्यांनी म्हटलं आहे. इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालयानं तयार केलेल्या या नियमावलीच्या मसुद्यावर जनतेच्या सूचना मागवल्या असून या सूचना 'माय गव्ह' या पोर्टलवर १८ फेब्रुवारीपर्यंत देता येतील.

**<><><><><>**

'भारतपोल' पोर्टल आणि तीन नवीन फौजदारी कायदे परदेशात पळून गेलेल्या गुन्हेगारांना पकडण्यासाठी मजबूत यंत्रणा म्हणून काम करतील, असं केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी म्हटलं आहे. ते आज नवी दिल्ली इथं सीबीआयनं विकसित केलेल्या 'भारतपोल' पोर्टलचं उद्घाटन करताना बोलत होते. हे पोर्टल तपास यंत्रणा आणि सर्व राज्यांच्या पोलिसांना १९५ देशांच्या इंटरपोल नेटवर्कशी जोडून गुन्हेगारीचं नियंत्रण करण्यात महत्त्वाची भूमिका बजावेल, असं ते यावेळी म्हणाले. भारतपोल पोर्टल जागतिक नेटवर्कच्या माध्यमातून रेड कॉर्नर नोटीस आणि इतर अलर्ट जारी करण्यासह अद्ययावत माहितीचं आदान प्रदान करण्यासाठी देशांतर्गत आणि आंतरराष्ट्रीय विनंत्यांना लक्षणीय प्रतिसाद देईल असं त्यांनी सांगितलं. कायद्याची अंमलबजावणी करणाऱ्या सर्व संस्थांना प्रतिसाद देण्यासाठी

भारतपोल, कनेक्ट, इंटरपोल नोटिस, संदर्भ, प्रसारण आणि संसाधनं, ही पाच प्रमुख मॉड्यूल  एक तांत्रिक मंच प्रदान करतील, असं अमित शाह यांनी सांगितलं.

**<><><><><>**

ई-श्रम पोर्टलवर रोज सरासरी ३० हजार असंघटित कामगारांची नोंदणी होत असल्याचं कामगार आणि रोजगार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी आज सांगितलं. ते आज नवी दिल्ली इथं ई-श्रम पोर्टलच्या बहुभाषिक सुविधेचं उद्घाटन करताना बोलत होते.

**<><><><><>**

एचएमपीव्ही विषाणूमुळे होणारा आजार गंभीर नसून बरा होणारा आहे, त्यामुळे नागरिकांनी घाबरून जाऊ नये. मात्र रोगप्रतिकारशक्ती कमी असलेल्यांची काळजी घ्यावी, असं आवाहन राज्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केलं आहे. मंत्रालयात एच एम पी व्ही विषाणूसंदर्भात आज झालेल्या बैठकीनंतर ते वार्ताहरांशी बोलत होते. या आजारासंदर्भात माध्यमांनी योग्य माहिती जनतेपर्यंत पोहोचवावी, असं आवाहन आबिटकर यांनी केलं. ते म्हणाले,

**होल्ड - आबिटकर बाइट**

वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ यांनी यावेळी बोलतांना, राज्यात आतापर्यंत या संसर्गाचा एकही रुग्ण आढळलेला नाही, असं स्पष्ट केलं आहे. तरीही सर्व वैद्यकीय महाविद्यालयांनी औषधांसह ऑक्सिजन आणि आवश्यकता वाटल्यास विलगीकरण व्यवस्थेच्या तयारीत राहावं, आणि वैद्यकीय महाविद्यालयांचे अधिकारी तसंच कर्मचाऱ्यांच्या रजा रद्द कराव्यात अशा सूचना मुश्रीफ यांनी दिल्या.

**<><><><><>**

राज्यातल्या चार चाकी वाहन धारकांना एक एप्रिल पासून फास्ट टॅग अनिवार्य करण्याचा निर्णय राज्य मंत्रिमंडळानं घेतला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र

फडनवीस यांच्या अध्यक्षतेखाली मुंबईत ही बैठक झाली.  १ एप्रिलपासून या निर्णयाची अंमलबजावणी होईल. प्रशासकीय कामकाज अधिक सुलभ आणि गतीमान करणारी सुधारित महाराष्ट्र शासन कार्यनियमावली प्रसिद्ध करायला मंत्रीमंडळानं आज मान्यता दिली. राज्यात 'ई कॅबीनेट' आणि या बैठकीत होणारे निर्णय पोर्टलच्या माध्यमातून राज्यातील जनतेला उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. मंत्रिमंडळासमोर सादर करण्यात येणारा प्रस्ताव ऑनलाईन अपलोड करणे, तो मंत्रिमंडळासमोर चर्चेसाठी आणि निर्णयासाठी सादर करणे, त्यावर अंतिम निर्णय आणि त्याबाबतच्या सर्व नोंदी ठेवणं, ही सर्व प्रक्रिया ई-कॅबिनेटमुळे सहजरित्या पार पडेल.

**<><><><><>**

दिल्ली विधानसभा निवडणुकीसाठी एकाच टप्प्यात ५ फेब्रुवारी रोजी मतदान होणार असून ८ फेब्रुवारीला मतमोजणी होईल. केंद्रीय निवडणूक आयोगानं आज नवी दिल्लीत पत्रकार परिषदेत निवडणूक कार्यक्रमाची घोषणा केली.  या निवडणुकीसाठी १० जानेवारीला अधिसूचना प्रसिद्ध होईल, १७ तारखेपर्यंत उमेदवारी अर्ज दाखल करता येतील. १८ तारखेला अर्जांची छाननी होऊन, २० तारखेपर्यंत अर्ज मागे घेण्याची मुदत आहे. २३ फेब्रुवारीला मुदत संपणाऱ्या दिल्ली विधानसभेत ७० जागा आहेत. गेल्या निवडणुकीत त्यातल्या ६२ जागा आम आदमी पार्टीनं तर ८ जागा भाजपानं जिंकल्या होत्या.

**<><><><><>**

राज्यातल्या विधानसभा निवडणुकीच्या दरम्यान मतदानाच्या दिवशी संध्याकाळी जाहीर झालेली आकडेवारी आणि दुसऱ्या दिवशी जाहीर झालेली आकडेवारी यात तफावत होती. पण त्यात कुठलीही छेडछाड झाली नसल्याचा निर्वाळा मुख्य निवडणूक आयुक्त राजीव कुमार यांनी दिला. मतदानाची आकडेवारी

बदलणं अशक्य आहे. काही मतदान केंद्रांवरुन अधिकारी कर्मचारी रात्री उशिरा किंवा दुसऱ्या दिवशी पोहोचतात. प्रत्येक मतदान केंद्रावर उमेदवारांच्या प्रतिनिधीला दिलेल्या १७ सी या अर्जातली मतदानाची आकडेवारी मतमोजणीच्या वेळी पडताळून दाखवली जाते, याचा पुनरुच्चार त्यांनी केला.

**<><><><>**

ईशान्य भारतातल्या चार राज्यांमधल्या मतदार याद्यांमध्ये महिलांचं प्रमाण पुरुषांपेक्षा जास्त असल्याचं निवडणूक आयोगानं म्हटलं आहे. देशभरातल्या मतदार याद्यांमध्ये  दर एक हजार पुरुषांमागे ९४८ महिला अशी सरासरी असताना मणिपूर, मिझोराम, मेघालय आणि अरुणाचल प्रदेश या राज्यांमध्ये दर हजार पुरुषांमागे एक हजाराहून जास्त महिला मतदार आहेत. देशातल्या महिला आणि पुरुष मतदारांच्या सरासरी गुणोत्तरात २०२३ च्या तुलनेत २०२४ सालात सुधारणा झाली असल्याचंही निवडणूक आयोगानं म्हटलं आहे.

**<><><><>**

माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी आज रेल्वे भवन इथं केंद्र सरकारच्या अधिकृत दिनदर्शिकेचं अनावरण केलं. यंदाच्या दिनदर्शिकेची संकल्पना 'जनभागीदारी से जन कल्याण' अशी आहे. 'सबका साथ, सबका विकास' या सरकारच्या ब्रीदवाक्याशी ही दिनदर्शिका सुसंगत असल्याचं वैष्णव म्हणाले.

**<><><><>**

नेपाळ-तिबेट सीमा भागात आज सकाळी झालेल्या भूकंपातल्या मृतांची संख्या ९५  वर पोहोचली आहे, तर १३० जण जखमी झाले आहेत. या भूकंपाची तीव्रता ७ पूर्णांक १ दशांश रिक्टर स्केल इतकी होती. नेपाळ सीमेजवळ तिबेट मधल्या  झिझांग इथं या भूकंपाचा केंद्रबिंदू होता. बिहार, पश्चिम बंगाल, सिक्कीमसह उत्तर भारताच्या काही भागातही या भूकंपाचे धक्के बसले. बिहारच्या काही भागात

ते तीव्र स्वरूपाचे होते, त्यामुळे नागरिकांमध्ये घबराट पसरली. यामध्ये अद्याप कोणतीही जीवितहानी अथवा मालमत्तेचं नुकसान झाल्याचं वृत्त नाही.

**<><><><><>**

कॅनडाला अमेरिकेचं ५१ वं राज्य करण्याचा मानस अमेरिकेचे नवनिर्वाचित राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी पुन्हा एकदा व्यक्त केला आहे. कॅनडाचे प्रधानमंत्री जस्टीन ट्रुडो यांनी काल राजीनामा दिला होता. त्यानंतर समाज माध्यमांवर ट्रम्प यांनी हा मानस व्यक्त केला.

**<><><><><>**

येत्या २०२८ मध्ये होणाऱ्या ऑलिम्पिक स्पर्धांसाठी भारताने  तयारीला सुरुवात केली असून खेळाडूंची कामगिरी सुधारण्यासाठी त्यांना सर्व सुविधा पुरवल्या जातील, असं केंद्रीय क्रीडामंत्री मनसुख मांडवीय यांनी म्हटलं आहे. नवी दिल्लीत आज झालेल्या मिशन ऑलिम्पिक सेल बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून ते बोलत होते. ताज्या दमाच्या होतकरू खेळाडूंचा शोध घेऊन त्यांना राष्ट्रीय आणि पुढे आंतरराष्ट्रीय पातळीवर आणण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातील असं ते म्हणाले.

**//<><><><><>//**